**Publication:** Sakal
**Date:** 11/10/2012
**Edition:** Mumbai
**Page No.:** 03
**Headline:** TCS Quiz

# टीसीएसची प्रश्नमंजुषा

मुंबई, ता. १० : टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसतर्फे 'टीसीएस आयटी विझ' ही प्रश्नमंजुषा घेण्यात येणार आहे. १४ ऑक्टोबर रोजी वांद्रे रेक्लमेशन येथील इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात ही स्पर्धा होणार आहे. आठवी ते बारावीत शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभागी होता येणार असून स्पर्धा विनामूल्य आहे. प्रत्येक शाळा दोन-दोन स्पर्धकांचे गट यासाठी पाठवू शकते. प्रवेशिका शाळांनी १२ ऑक्टोबरपूर्वी टीसीएस आयटी विझ को-ऑर्डिनेटर, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, रेव्हलाईन स्ट्रीट, २१, डीएस मार्ग, फोर्ट या पत्त्यावर पाठवायच्या आहेत. www.tcsitwiz.com या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणीदेखील करता येईल. अधिक माहितीसाठी संपर्क - ६७७८९०८०/८१.